दैनिक मराठवाडा पत्र



# बीडच्या कपिलधारमध्ये 'आपदा मित्र–सखी' प्रशिक्षण कार्यक्रम सुरु; ग्रामसुरक्षेसाठी सज्ज स्वयंसेवकांची नवी फौज

**बीड । प्रतिनिधी**

कपिलधार येथे ११ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले ' आपदा मित्र–सखी ' प्रशिक्षण केवळ एक औपचारिक उपक्रम न राहता ग्रामसुरक्षेच्या नव्या युगाची नांदी ठरले आहे . आपत्ती आली तर घाबरायचे नाही , सज्ज व्हायचे आणि वाचवायचे या प्रेरणादायी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला असून युवक , युवती , महिला आणि मच्छिमार बांधवांनी मोठ्या उत्साहात या प्रशिक्षणात सहभाग नोंदवला आहे . ग्रामपातळीवर स्वयंसेवकांची सक्षम फौज तयार करून आपत्ती व्यवस्थापनात स्वयंस्फूर्ती निर्माण करण्याचा हा उपक्रम ग्रामसुरक्षेचा नवा अध्याय लिहिणारा ठरत आहे . राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या मार्गदर्शनाखाली , राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण , राज्य आपत्ती प्रतिसाद दल मुंबई आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण बीड यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे . शासन आणि प्रशासनाच्या समन्वयातून राबविण्यात आलेला हा उपक्रम ग्रामीण भागातील आपत्ती सज्जतेसाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे . या प्रशिक्षण कार्यक्रमास आपत्ती प्रतिसाद दलाचे डेप्युटी कमांडंट अशोक कुमार यांची विशेष उपस्थिती लाभली . त्यांच्या उपस्थितीमुळे प्रशिक्षणाला शिस्त , प्रेरणा आणि उत्साह मिळाला . त्यांनी स्वयंसेवकांशी संवाद साधत आपत्तीच्या काळात नागरिकांची भूमिका किती महत्त्वाची असते , यावर प्रकाश टाकला . आपत्ती प्रतिसाद दलाच्या पाचव्या तुकडीतील निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी प्रभावी मार्गदर्शन करत प्रशिक्षणार्थींमध्ये आत्मविश्वास जागवला . बचावकार्याच्या प्रत्यक्ष तंत्रांपासून ते आपत्कालीन परिस्थितीत निर्णयक्षमता कशी वाढवायची , याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले . सहायक निरीक्षक खुंटे यांनीही उत्साही सत्र घेत दोरीच्या साहाय्याने बचाव , पूरस्थितीत सुटका , प्राथमिक उपचार आणि आपत्कालीन समन्वय याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके



दाखवली . प्रशिक्षणार्थींनी या सत्रांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला .जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले . जिल्हा प्रशासनाच्या दूरदृष्टीतून आणि नियोजनातून हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला . निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी ग्रामपातळीवरील आपत्ती सज्जतेचे महत्त्व अधोरेखित करत स्वयंसेवकांना जबाबदारीची जाणीव करून दिली . त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी उपस्थितांमध्ये आत्मविश्वास आणि सेवाभाव वाढीस लागला . बीडचे तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी चंद्रकांत शेळके यांनी प्रशिक्षणार्थींना संबोधित करत प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय किती आवश्यक आहे हे स्पष्ट केले . त्यांनी सांगितले की , आपत्तीच्या काळात शासन यंत्रणा तातडीने कामाला लागते , परंतु ग्रामपातळीवर सज्ज स्वयंसेवक असतील तर बचावकार्य अधिक जलद आणि प्रभावी होते . त्यांच्या ठाम आणि सकारात्मक मार्गदर्शनामुळे प्रशिक्षणार्थींमध्ये शिस्त , सजगता आणि समाजसेवेची भावना अधिक दृढ झाली . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही मार्गदर्शन करत महिलांचा सहभाग वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले . या संपूर्ण प्रशिक्षणाचे कुशल नियोजन नोडल अधिकारी सुहास हजारे करत आहेत . त्यांच्या नियोजनामुळे प्रशिक्षण शिस्तबद्ध, गतिमान आणि परिणामकारक पद्धतीने पार पडत आहे . दिनांक १५ रोजी रविवारी प्रशिक्षणाचा समारोप होणार आहे. प्रशिक्षणात प्राथमिक उपचार, हृदयपुनरुज्जीवन प्रक्रिया , पूरस्थितीत बचावकार्य , दोरीच्या साहाय्याने सुटका तंत्र, आपत्कालीन समन्वय , संप्रेषण व्यवस्था , बचावनौकेचा वापर आणि आपत्तीच्या वेळी नागरिकांचे स्थलांतर या सर्व बाबींचे सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. शनिवारी प्रशिक्षणादरम्यान बचावनौकेचे प्रात्यक्षिक पाहताना प्रशिक्षणार्थींमध्ये उत्साहाचे वातावरण होते . स्वयंसेवकांनी स्वतः प्रत्यक्ष सराव करत बचाव तंत्रांचा अनुभव घेतला . पाण्यातील बचावकार्य, जीवजाकीटचा योग्य वापर , दोरीच्या साहाय्याने सुटका आणि जखमींना सुरक्षित ठिकाणी नेण्याचे तंत्र यांचे प्रात्यक्षिक सत्र विशेष आकर्षण ठरले . या उपक्रमासाठी महसूल आणि ग्रामपातळीवरील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले . मंडळ अधिकारी सोनाली कदम आणि शितल चाटे यांनी समन्वय साधला . ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण ओव्हाळ यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत प्रशिक्षणात उत्साह निर्माण केला . शिवराम येवले , अनिल गायकवाड , राजाभाऊ गायकवाड , सुनील प्रधान , शेख गफूर , मीनल खांडे , राधिका बहिर आणि रेश्मा ताणगे यांनीही उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात सक्रिय सहभाग नोंदवला . विस्तार अधिकारी तुकाराम जाधव आणि सहाय्यक महसूल अधिकारी राहुल कसबे तसेच महसूल सहाय्यक विवेक कोळपकर यांनीही या प्रशिक्षणात महत्त्वाची भूमिका बजावली . त्यांच्या सहकार्यामुळे प्रशिक्षणाचे सर्व टप्पे सुरळीत पार पडले . प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सहभागी स्वयंसेवकांना प्रमाणपत्र देण्यात येणार असून भविष्यात आपत्तीच्या प्रसंगी प्रशासनाला खांद्याला खांदा लावून मदत करण्याची जबाबदारी ते पार पाडणार आहेत . यामुळे गावपातळीवर प्रशिक्षित स्वयंसेवकांची फौज तयार होणार असून आपत्तीच्या वेळी पहिला प्रतिसाद देणारी स्थानिक यंत्रणा निर्माण होणार आहे . ग्रामीण भागात पूर , दुष्काळ , आगीच्या घटना , अपघात किंवा इतर आपत्तींचा धोका असतो . अशा वेळी स्थानिक पातळीवर प्रशिक्षित स्वयंसेवक असणे ही काळाची गरज आहे . संकटात धावून येणारा माणूसच खरा देव अशी म्हण आहे . आपदा मित्र–सखी प्रशिक्षणातून अशाच देवदूतांची फौज तयार होत असल्याचे चित्र कपिलधार येथे पाहायला मिळाले . या प्रशिक्षणामुळे गावातील युवक–युवतींमध्ये आत्मविश्वास वाढला असून समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा निर्माण झाली आहे . महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून ग्रामसुरक्षेत आपली भूमिका सिद्ध केली आहे . एकीचे बळ मोठे ही म्हण येथे अक्षरशः खरी ठरताना दिसली.

कपिलधारमधील हा ऊर्जादायी आणि प्रेरणादायी उपक्रम ग्रामसुरक्षेच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरत आहे . संकटाच्या वेळी धावून जाण्यास सज्ज असलेली स्वयंसेवकांची नवी फौज आता गावाच्या सुरक्षित भविष्यासाठी आत्मविश्वासाचे बळ ठरत आहे . गावाने दाखवलेली ही एकजूट , सज्जता आणि सेवाभाव इतर गावांसाठीही आदर्श ठरणारा आहे . या प्रशिक्षणातून एक संदेश स्पष्ट झाला आहे – आपत्तीच्या काळात केवळ शासनावर अवलंबून न राहता समाजाने स्वतः सज्ज होणे आवश्यक आहे . प्रशिक्षित स्वयंसेवकांच्या माध्यमातून गावागावात सुरक्षिततेची नवी संस्कृती निर्माण होऊ शकते .

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते – सज्ज ग्राम , सुरक्षित समाज हा संदेश देत कपिलधारमधील ' आपदा मित्र–सखी ' प्रशिक्षणाने ग्रामसुरक्षेच्या दिशेने आशेचा नवा दीप प्रज्वलित केला आहे .

# हुंडा समाजाला लागलेली मोठी कीड अतिथी व्याख्यानात मान्यवरांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

हुंडा ही केवळ एक प्रथा नसून आपल्या समाजाच्या प्रगतीला लागलेली मोठी कीड आहे. ही प्रथा मुळापासून उखडून टाकण्यासाठी केवळ कायद्याची भीती पुरेशी नसून, तरुण पिढीने वैचारिक प्रगल्भता दाखवणे काळाची गरज आहे, असे परखड मत प्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. सुनंदा आहेर यांनी व्यक्त केले. येथील सौ. के.एस.के. महाविद्यालयामध्ये आयोजित 'हुंडा पद्धत: समाजाला लागलेली कीड' या विषयावरील विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. पूर्वी 'स्त्रीधन' म्हणून ओळखली जाणारी ही पद्धत आता हक्काने मागितली जाणारी 'खंडणी' झाली



असल्याचे त्यांनी नमूद केले. स्त्री–पुरुष समानता: जोपर्यंत मुलीला दुय्यम आणि मुलाला 'विक्रीची वस्तू' मानणे थांबत नाही, तोपर्यंत ही प्रथा संपणार नाही.उपस्थितांना आवाहन करताना त्या म्हणाल्या की, लग्नात हुंडा न घेण्याची शपथ तरुणांनी घेतली पाहिजे आणि पालकांनीही मुलाच्या शिक्षणाचा 'व्यापार' करणे थांबवले पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील देवळाणकर हे म्हणाले की, हुंडाबळी आणि हुंड्यामुळे कर्जबाजारी होणारी कुटुंबे यांची हृदयद्रावक उदाहरणे देण्यात आली. केवळ कायदे करून समाज बदलत नाही, तर त्यासाठी लोकचळवळ उभी राहणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले. ज्या दिवशी वधू–वरांचे गुण पाहून लग्ने ठरतील आणि पैशांचे पाकीट पाहून नाही, त्या दिवशी आपला समाज खऱ्या अर्थाने सुसंस्कृत होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन डॉ. यादव घोडके यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शितल हिरवे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रसंत गाडगे महाराज १५० व्या जयंती निमित्त कार्यकारिणी बैठक

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गाडगे महाराज संस्कृत सभागृह, मोंढा रोड, बीड येथे दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने कार्यकारिणी बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. यानंतर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून जयंतीच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली.या बैठकीत मार्गदर्शन केले



बीड जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, रवी जाधव, विलास जाधव आणि गणेश राऊत यांनी. बैठकीचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परिट धोबी समाजसेवा मंडळाचे बीड जिल्हा अध्यक्ष ॲड. सुधीर जाधव होते. याप्रसंगी बीड जिल्हा सचिव प्रवीण साळुंके, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, शहर उपाध्यक्ष शितल राऊत, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर कार्याध्यक्ष संतोष भालेकर आदी उपस्थित होते.

कार्यकारिणीची निवड आयोगाने केली असून अध्यक्षपदी संजय साळुंके, उपाध्यक्षपदी नितीन नवले आणि सचिवपदी युवराज धोंगडे यांची निवड करण्यात आली आहे.

तसेच दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सोमवार दुपारी ५.०० वाजता मोठ्या थाटात मिरवणूक काढण्याचे कार्यक्रम ठरविले आहे. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू होणार आहे. मिरवणुकीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक – बशीरगंज – राजुरी वेस – कारंजा – बलभीम चौक – धोंडीपुरा – माळीवेस मार्गाने जाऊन राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुतळ्याजवळ येऊन अभिवादन करून महाप्रसादांसह समारोप होणार आहे.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड या संस्थेच्यावतीने गाव बिबी ता.लोणार जि.बुलढाणा येथे १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात भारताचे ४० वीर जवान शहीद झाले होते. या घटनेने संपूर्ण देश हळहळला होता. आज या घटनेच्या स्मृतिदिनी, बीड येथील 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थे'ने या ४० हुतात्म्यांना अनोख्या पद्धतीने आदरांजली वाहिली आहे. संस्थेच्या वतीने ४० जवानांच्या नावी ४० झाडांची लागवड करून एक 'हिरवी श्रद्धांजली' अर्पण करण्यात आली व एक झाड एक जीवन अभियान राबवण्यात आले. यावेळी उपस्थित संस्थेचे अभियान प्रमुख तेजस्विनी पवार,रोहन डोळस, सदस्य,सागर,ओंकार,सायली,मयुरी, अभय,रोहित,संतोष,शुभम,स्वप्नील,बळी, सर्व सहकारी उपस्थित होते.*

# सौ. के.एस.के. महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त गृहशास्त्र विभागामध्ये विविध स्पर्धा व प्रदर्शन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड येथे दि. ०६ फेब्रुवारी २०२६ वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. यावेळी गृहशास्त्र विभागाच्या वतीने रांगोळी, पुष्परचना व पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या विविध स्पर्धामध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून प्रमाणपत्र देण्यात आले. या



स्पर्धेमध्ये रेखाटलेल्या रांगोळी, पुष्पप्रदर्शन व पाककलेचे नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव व कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी संमेलनाचे प्रमुख वक्ते डॉ. विष्णु सुरासे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे आदी उपस्थित होते. या सर्व स्पर्धेसाठी गृहशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. वंदना फटाले, प्रा. शाम कुरे, डॉ. दादासाहेब खोगरे, डॉ. मंजुषा जाधव, प्रा. मंजुषा कुलकर्णी, प्रा. जयश्री नागुरे यांनी परिश्रम घेतले

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थिनींचा निरोप समारंभ

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आणि राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावीतील विद्यार्थिनींचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके होते.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना पत्रकार संघाचा राज्यस्तरीय महाराष्ट्र राजरत्न प्रशासकीय अधिकारी पुरस्कार २०२६ जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने मार्च २०२० मध्ये होणाऱ्या बीड येथील राज्यस्तरीय मेळाव्यामध्ये महाराष्ट्राचे राजरत्न प्रशासकीय अधिकारी २०२६ या सन्मानाच्या पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराच्या निवडीचे लेखी पत्र त्यांना अधिकृतरित्या पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला जिल्हाप्रमुख शेख आयेशा यांनी प्रत्यक्ष भेटून दिले.

बीड येथे जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतल्यापासून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अमुलाग्र निर्णय घेत त्या निर्णयावर अंमलबजावणी सुरू केलेली आहे. प्रामुख्याने बालविवाह थांबवण्यासाठी, बीड जिल्ह्यातील वाढलेली गुंडगिरी थांबवण्यासाठी, सामाजिक सलोखा आणि ऐक्य निर्माण करण्यासाठी, कॉपीमुक्त अभियानामध्ये घेतलेले ठोस निर्णय,



तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि प्रशासकीय सेवेतील गतिमानता यासह सर्वांगीण क्षेत्रांमध्ये त्यांचे काम उल्लेखनीय आहे. त्यांनी सामान्य जनतेचे प्रश्न मार्गी लागावेत यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नियमित जनता दरबार सुरू केला. या दरबारातून शेकडो नव्हे हजारो जनतेचे प्रलंबित प्रश्न मार्गी लागले. अशा कर्तव्यदक्ष जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्याची दखल घेऊन पत्रकार संघाच्या वतीने मार्च २०२६ मध्ये बीड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मेळाव्यात मान्यवरांच्या शुभहस्ते जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना महाराष्ट्राचे राजरत्न प्रशासकीय अधिकारी पुरस्कार २०२६ या सन्मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांनी हा पुरस्कार स्वीकारल्या बाबत पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांच्याकडून पुरस्कारासाठी निवड झाल्याचे पत्र स्वीकारून कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहण्याची हमी दिली. यामुळे कार्यक्रमातील पुरस्काराची उंची निश्चितच आणखीन उंचावली आहे. त्यांनी पुरस्कार स्वीकारल्याबद्दल पत्रकार संघाच्या जिल्हा शाखेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पत्रकारांचा स्तूत्य उपक्रम...!

## शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून एसटी बसेसला दिल्या नवीन डिजिटल पाट्या

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेर पत्रकार संघ व सामाजिक कार्यकर्त्यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून बीड आगारातील एसटी महामंडळाच्या अनेक एसटी बसेस वर लावण्यात येणाऱ्या गावाच्या नावांच्या पाट्या जीर्ण झाल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असे. ही समस्या लक्षात घेऊन पिंपळनेर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट यांनी नवीन डिजिटल गावाच्या नावांच्या पाट्या तयार करून एसटी प्रशासनाला भेट दिल्या. शिवप्रसाद सिरसाट यांनी हाती घेतलेल्या या नवीन उपक्रमाचे सर्व स्तरातून



कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

बीड आगारातून बीड– ईट–पिंपळनेर– नाथापूर, बीड– ईट–पिंपळनेर– नाथापूर– रांजणगाव, बीड–ईट–आडगाव आदी ग्रामीण भागात धावणाऱ्या अनेक एसटी बसेसना स्पष्ट बोर्ड नसल्याने प्रवाशांना वारंवार एसटी बस चालक व वाहकांना विचारणा करावी लागत असे. यामुळे एसटी बस चालक– वाहकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत होता. तसेच अनेकदा बोर्ड नसल्यामुळे बस जवळून गेली तरी प्रवाशांना ती ओळखता येत नव्हती. ही बाब पिंपळनेर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून बीड आगारासाठी नवीन डिजिटल पाट्या तयार करून बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी या पाट्या बीड आगाराच्या वाहतूक नियंत्रक श्रीमती आयेशा शेख व वाहतूक नियंत्रक महेश भावसार यांच्याकडे सुपूर्त केल्या.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, संपादक तथा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. आत्माराम वाव्हळकर, पत्रकार प्रज्वल सिरसाट, सातपुते तसेच एसटी आगारातील कर्मचारी, बस चालक, वाहक आणि प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना बस ओळखणे सोपे होणार असून शिवप्रसाद सिरसाट यांच्या या स्तूत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.


महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ •

## थोडक्यात...

### श्री दत्त संस्थान बालाघाट येथे महाशिवरात्र उत्सव उत्साहात साजरा होणार



**बीड । प्रतिनिधी**

श्री दत्त संस्थान बालाघाट, कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. प.पु.ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्त उपासक श्री वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाशिवरात्र हा भगवान श्री शंकराचा अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. या दिवशी पहाटे लवकर भगवान श्री शंकरांना विधीवत महारुद्र अभिषेक करण्यात येणार असून, वेदमंत्रांच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून जाणार आहे. त्यानंतर महाआरती संपन्न होईल. भाविक भक्तांना अभिषेक व आरतीचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यावर्षी विशेष आकर्षण म्हणून संगीत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, संगीत क्षेत्रातील मान्यवर कलाकार उपस्थित राहणार आहेत. बालाघाट डोंगर परिसरात होणारा हा कार्यक्रम भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरणार आहे. तसेच महाशिवरात्र पूर्वकाळात विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात येत असून, दिवसभरात महारुद्र अभिषेक, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील तसेच बाहेरील भागातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. या पवित्र महाशिवरात्र उत्सवाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन दत्त उपासक श्री वैजिनाथ महाराज शिंदे यांनी केले आहे.

### राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या १५० व्या जयंतीच्या अध्यक्षपदी संजय साळुंके, उपाध्यक्षपदी नितीन नवले तर सचिवपदी महेंद्र वाघमारे यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गाडगे महाराज संस्कृत सभागृह, मोंढा रोड, बीड येथे दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या १५० व्या सार्वजनिक जयंतीच्या निमित्ताने कार्यकारिणी बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. यानंतर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून जयंतीच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. या बैठकीत मार्गदर्शन केले बीड जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, रवी जाधव, विलास जाधव आणि गणेश राऊत यांनी. बैठकीचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परिट धोबी समाजसेवा मंडळाचे बीड जिल्हा अध्यक्ष ॲड. सुधीर जाधव इत्यादींच्या उपस्थितीत तसेच बीड जिल्हा सचिव प्रवीण साळुंके, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, शहर उपाध्यक्ष शितल राऊत, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर कार्याध्यक्ष संतोष भालेकर आदी उपस्थित होते. कार्यकारिणीची निवडीचे स्वागत केली असून अध्यक्षपदी संजय साळुंके, उपाध्यक्षपदी नितीन नवले आणि सचिवपदी महेंद्र वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीचे स्वागत राज्य कार्याध्यक्ष गणेश जगताप, बीड शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, शहराध्यक्ष अंबादास नवले, जगन्नाथ शिंदे, जयंत राऊत, प्रकाश जाधव, संजय नवले, मनोज वाघमारे, युवक सेवा सचिव अतुल साळुंके, प्रा.विजय जाधव, संदीप जाधव, अमोल काळे, मनोज नवले, गणेश धोंगडे, नितीन नवले इत्यादींनी पुढील कार्यास शुभेच्छा देवून स्वागत केले. तसेच दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सोमवार दुपारी ५.०० वाजता मोठ्या थाटात मिरवणूक काढण्याचे कार्यक्रम ठरविले आहे. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू होणार आहे. मिरवणुकीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक – बशीरगंज – राजुरी वेस – कारंजा – बलभीम चौक – धोंडीपुरा – माळीवेस मार्गाने जाऊन राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुतळ्याजवळ येऊन अभिवादन करून महाप्रसादांसह समारोप होणार आहे.

### शिक्षण महर्षी 'स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त' आंतरशालेय रंगभरण स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संस्थेचे संस्थापक सचिव शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी भव्य आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत बीड शहरातील यशवंत विद्यालय व शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय या केंद्रांवर मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपली कलात्मकता सादर केली. छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आणि यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन शिक्षण क्षेत्रात संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंती निमित्ताने आंतर शालेय रंगभरन स्पर्धा शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. बीड शहरातील यशवंत विद्यालयात झालेल्या स्पर्धेत बीड शहरातील १९ शाळांनी सहभाग नोंदवला. तसेच ३२५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव वाघ यांच्या कार्याची आठवण जागवण्यात आली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संबंधित केंद्रांवर करण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणात एटीआर समितीत केला बदल

**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या चौकशी अहवालावर 'क्शन टेकन रिपोर्ट' अर्थात कृती आराखडा (एटीआर) तयार करणाऱ्या समितीत बदल करण्यात आला आहे. सहसचिव व्यंकटेश भट यांच्या जागी आता सहसचिव सुग्रीव धपाटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाची न्यायालयात सुनावणी सुरू असून 'क्शन टेकन रिपोर्ट' समितीमध्ये सरकारने बदल केला आहे. ९डिसेंबर २०२४ रोजी झाल्या नंतर ९ जानेवारी रोजी स्थापन करण्यात आलेल्या समितीत सह सचिव व्यंकटेश भट यांचा समावेश होता. मात्र, शासनाने शुक्रवारी काढलेल्या नवीन निर्णयानुसार भट यांच्या जागी आता सह सचिव सुग्रीव धपाटे यांची नियुक्ती करण्यात आली असून, यामुळे प्रशासकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.हत्या प्रकरणात वाल्मीक कराड मुख्य आरोपी आहे. सध्या तो तुरुंगात आहे. न्यायमूर्ती ताहलियानी समितीच्या अहवालाची छाननी करण्यासाठी गृह खात्याच्या अपर मुख्य सचिवांच्या नेतृत्वात ही उच्चस्तरीय



समिती कार्यरत आहे. या बदलामुळे तपासाला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. समितीचा अहवाल लवकरच विधिमंडळात सादर केलाच जाण्याची शक्यता आहे. हत्याप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई आणि भविष्यातील उपाययोजनांचा आराखडा ही समिती तयार करणार आहे. या प्रकरणात त्वरित न्याय मिळावा यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे, अशी भावना धनंजय देशमुख यांनी व्यक्त केल्या. दरम्यान उच्चस्तरीय समिती अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली काम करत असून यामध्ये प्रधान सचिव (विशेष) आणि अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) यांसारख्या बड्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. न्यायमूर्ती एम. एल. ताहलियानी समितीने सादर केलेल्या अहवालातील निष्कर्षांची सखोल छाननी करणे, हे या समितीचे मुख्य उद्दिष्ट आहे. संतोष देशमुख यांच्या मृत्यूशी संबंधित अनेक गंभीर बाबी या अहवालात नमूद करण्यात आल्याचे समजते, ज्यावर आता ही नवीन समिती आपले मत मांडणार आहे. ही समिती जो काही अहवाल सादर करणार आहे, त्याचे आगामी विधिमंडळाच्या अधिवेशनात पडसाद उमटण्याची शक्यता आहे. सह सचिव स्तरावरील या बदलामुळे आता अहवालाच्या छाननीमध्ये नेमके काय नवीन मुद्दे समोर येतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# नामदार पंकजाताई मुंडे यांचा नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे पाटील यांनी परळी येथे जाऊन हृदयपूर्वक सत्कार संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

परळी येथे जाऊन बीड येथील नगरसेवक ॲड.गोविंद नवनाथ शिराळे पाटील यांनी राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांचा नगरसेवक म्हणून संधी दिल्याबद्दल हृदयपूर्वक सत्कार परळी येथे जाऊन केला व नंतर पंकजाताई यांनी नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे पाटील यांना सांगितले की आपल्यावर खूप मोठी बीड शहराची लोकांचे काम करण्याची जबाबदारी आहे ती जबाबदारी आपण लोकांचे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडून त्यांना बीड नगरपालिकेच्या माध्यमातून सर्व सामान्य लोकांना न्याय देऊन आपल्यावर टाकलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडा अशा सूचना देखील यावेळी नामदार श्रीमती पंकजाताई मुंडे यांनी केल्या या व पुढील उत्कृष्ट त्यांच्या हातून होणाऱ्या बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या बीड नगरपालिकेच्या माध्यमातून होणाऱ्या कार्याच्या सेवेसाठी श्रीमती नामदार पंकजाताई मुंडे यांनी देखील नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे पाटील यांना शुभेच्छा दिल्या यावेळी येथे उपस्थित असलेले भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील तसेच उपस्थित असलेल्या बीड जिल्हा नगर परिषदेच्या माजी अध्यक्षा श्रीमती मीराताई गाधंले तसेच लोकशाही पत्रकार संघाचे सर्वे सर्वा संस्थापक बीबी वैद्य साहेब तसेच पेठ बीड भागातील माजी नगरसेवक बाबुराव पडळकर तसेच लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह मान्यवर उपस्थित होते.

# वाढदिवसानिमित्त नेत्रदानाचा संकल्प; जिल्हा रुग्णालयात प्रेरणादायी उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी विशाखा सूर्यवंशी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजाभिमुख निर्णय घेत नेत्रदानाचा संकल्प केला. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमामुळे जिल्हा रुग्णालयात सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

नेत्रदान संकल्पाचे प्रमाणपत्र प्रदान करताना जिल्हा रुग्णालयाचे ईसीएस डॉ. मुजाहिद सर, डॉ. फरीदा मॅडम आणि डॉ. जरांगे सर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विशाखा सूर्यवंशी यांच्या सामाजिक बांधिलकीचे



कौतुक करत, वाढदिवस साजरा करण्याचा हा खऱ्या अर्थाने समाजोपयोगी मार्ग आहे. अशा उपक्रमांमुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल, असे मत व्यक्त केले.नेत्रदान हा मृत्यूनंतर दोन अंध व्यक्तींना दृष्टी देऊ शकणारा महत्त्वाचा उपक्रम आहे. समाजात अजूनही नेत्रदानाबाबत जागरूकतेची गरज असताना जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. विशाखा सूर्यवंशी यांनी सांगितले की, वाढदिवसाच्या निमित्ताने समाजासाठी काहीतरी अर्थपूर्ण करण्याची इच्छा होती. नेत्रदानामुळे कुणाच्या आयुष्यात प्रकाश आणता येणार असेल तर त्याहून मोठी भेट नाही. या उपक्रमामुळे जिल्हा रुग्णालयात नेत्रदानाबाबत जनजागृतीला चालना मिळणार असून इतर कर्मचारी व नागरिकांनीही पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले.

## श्री. हरिभाऊ शेळके यांची किसान सेनेच्या बीड तालुका अध्यक्षपदी निवड

**बीड । प्रतिनिधी**


सामाजिक कार्यकर्ते तथा एकनिष्ठा शिवसैनिक श्री हरिभाऊ शेळके यांची शिंदे गटाच्या बीड तालुका प्रमुख पदी किसान सेनेच्या तालुका प्रमुख पदे निवड झाल्याने सर्वत्र अभिनंदन होत आहे गेल्या अनेक वर्षापासून वांगी येथील सामाजिक कार्यकर्ते २० टक्के राजकारण ८० टक्के समाजकारण करणारे स्वर्गीय हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेवर काम करणारे हरिभाऊ शेळके यांच्या कार्याची दखल घेऊन उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांच्या आदेशावरून व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल



दादा जगताप यांच्या शिफारशीवर हरिभाऊ शेळके यांची किसान सेनेच्या तालुकाप्रमुख पदी निवड करण्यात आली त्यामुळे अनेक पदाधिकारी व शिवसैनिकांनी तसेच मित्रांनी त्यांचे स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा चा वर्षाव करण्यात येत आहे.

# कार्यशाळा आणि सराव परीक्षेमुळे घडले यश; आदित्यचे विद्यार्थी टीईटीत अव्वल

## प्रजासत्ताक दिनी विद्यार्थ्यांचा सत्कार, तज्ज्ञ मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना झाला फायदा



**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत आदित्य अध्यापक महाविद्यालय व आदित्य विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चक-ढएढ २०२५ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला नवा गौरव प्राप्त करून दिला. कार्यशाळा आणि सराव परीक्षेमुळे हे यश मिळाले. या यशामागे तज्ज्ञ मार्गदर्शक प्राध्यापकांचा मोठा वाटा आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शेरिन बेगम सदुल्ला, मोटे आकांक्षा अशोक, घुमरे सुनंदा लक्ष्मणराव,बागलाने प्रतिभा, आफरीन बेगम कलीम शेख, सोनवणे महेश रामकिसन,घोडके अनिकेत नारद,संदिप कागदे,परजणे सुरेश लक्ष्मण,रोमन दीपक श्रीराम व शेंबडे अक्षय दादासाहेब या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतल्यानंतर सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व डॉ. अदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, आंबेजोगाई येथील ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. राजेश गोरे यांच्या उपस्थितीमध्ये विशेष टीईटी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. दर महिन्याच्या बुधवारी नियमित सराव परीक्षा घेण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. प्राचार्य मनिषा बावणे, प्रा. बी. एस. जगताप, प्रा. आर. ए. कारगुडे, प्रा. आय. आर. सय्यद व प्रा. एम. सी. चावर यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. छात्रसेवा शिबिरे, सराव पाठ व विविध शाळांमधील अध्यापन उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाली. याच सर्वसमावेशक प्रयत्नांचे फळ म्हणून विद्यार्थ्यांनी टीईटी परीक्षेत यश मिळवले.

### ● प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचे यश

**विद्यार्थांचे पालक दादासाहेब शेंबडे , लक्ष्मण परजणे व अशोक मोटे यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तम यश मिळाल्याचे सांगत संस्थेचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.**

### ● महाविद्यालयामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला

**टीईटीत परीक्षेत विद्यार्थांनी जेव्हा यश संपादन केले तेव्हा त्यांचे पालक घोडके नारद, रोमन श्रीराम, घुमरे लक्ष्मण, शेख कलीम व सोनवणे रामकिसन म्हणाले की, महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या टीईटी मार्गदर्शन कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला. नियोजनबद्ध अभ्यास पद्धती व सराव परीक्षेमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. आदित्य अध्यापक महाविद्यालय हे शिक्षक घडविणारे महाविद्यालय असल्याच्या प्रतिक्रीया पालकांनी व्यक्त केल्या.**